मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# धोकादायक इमारती, अतिक्रमणांवर तातडीने कारवाई करण्याचे आयुक्तांचे निर्देश...

## अतिक्रमण, अनधिकृत बांधकामे, हॉकर्स व्यवस्थापन आणि विकास प्रकल्पांचा आढावा; अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर प्रशासनाला सतर्कतेच्या सूचना

**पिंपरी | प्रतिनिधी**

शहरातील अतिधोकादायक इमारती, अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे, हॉकर्स व्यवस्थापन आणि विविध विकास प्रकल्पांचा आढावा घेण्यासाठी महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देत धोकादायक इमारतींवर तातडीने कारवाई करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले.

धोकादायक इमारतींच्या मालकांना त्वरित नोटिसा बजावून इमारती रिकाम्या करण्याच्या सूचना द्याव्यात, तसेच आवश्यक ती पुढील कारवाई तातडीने करावी, असे आयुक्तांनी सांगितले. फुटपाथवरील अतिक्रमणे हटवून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देणे, हॉकर्स व्यवस्थापन, अनधिकृत बांधकामांवर प्रभावी कारवाई आणि बांधकाम परवानग्यांची नियमित पडताळणी करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.



### धोकादायक इमारतींवर तातडीची कारवाई

» अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर शहरातील अतिधोकादायक इमारती नागरिकांच्या जीविताला धोका ठरू शकतात. त्यामुळे अशा इमारतींच्या मालकांना तातडीने नोटिसा बजावून इमारती रिकाम्या करण्याचे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिले आहेत. संबंधित विभागांनी आवश्यक ती पुढील कायदेशीर कारवाईही विलंब न लावता करावी, असे स्पष्ट करण्यात आले. संभाव्य दुर्घटना टाळण्यासाठी धोकादायक इमारतींची नियमित तपासणी करून नागरिकांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्याच्या सूचनाही प्रशासनाला देण्यात आल्या.

### अतिक्रमण व अनधिकृत बांधकामांवर लक्ष

» शहरातील फुटपाथ अतिक्रमणमुक्त करून पादचाऱ्यांसाठी सुरक्षित मार्ग उपलब्ध करून देण्यावर महापालिकेने भर दिला आहे. हॉकर्स व्यवस्थापन अधिक प्रभावी करण्याबरोबरच अनधिकृत बांधकामांवर कठोर कारवाई आणि बांधकाम परवानग्यांची नियमित पडताळणी करण्याचे आदेश देण्यात आले. शहर नियोजनात अडथळा ठरणाऱ्या अनधिकृत कामांवर नियंत्रण ठेवून नियमानुसार विकासकामे राबविण्यासाठी संबंधित विभागांनी समन्वयाने काम करण्याचे निर्देश आयुक्तांनी अधिकाऱ्यांना दिले.

नाले व पाणीवाहिन्यांचा नैसर्गिक प्रवाह अबाधित ठेवावा, पाणी साचण्याच्या तक्रारींवर तत्काळ कार्यवाही करावी आणि विकास प्रकल्पांची कामे वेळेत व दर्जेदार पद्धतीने पूर्ण करावीत, असेही त्यांनी स्पष्ट केले. यासोबतच नागरिकांमध्ये ओला व सुका कचरा विलगीकरणाबाबत जनजागृती करून न्यायालयाच्या आदेशांची माहिती देण्याचे निर्देश आयुक्तांनी प्रशासनाला दिले.

नाले आणि पाणीवाहिन्यांचा नैसर्गिक प्रवाह कायम ठेवणे, पाणी साचण्याच्या तक्रारींवर तातडीने उपाययोजना करणे आणि सर्व विकास प्रकल्पांची कामे दर्जेदार व वेळेत पूर्ण करणे, यावर बैठकीत विशेष भर देण्यात आला. तसेच ओला व सुका कचरा विलगीकरणाबाबत नागरिकांमध्ये जनजागृती वाढविणे आणि न्यायालयाच्या आदेशांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. शहराचा शाश्वत विकास आणि नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देणे हे प्रशासनाचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचे बैठकीत स्पष्ट करण्यात आले.

---

# घाटमाथ्यावर संततधार पाऊस; पवना धरणातून 10,000 क्युसेकने विसर्ग, नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## सध्या नदीपात्रात 5,720 क्युसेक विसर्ग सुरू असून तो वाढवून आज (दि.03) रोजी सकाळी दहा वाजता 10,000 क्युसेक इतका करण्यात आला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

घाटमाथ्यावर पवना धरण क्षेत्रात कालपासून पावसाने चांगलाच जोर धरला आहे. सुरू असलेल्या संततधार पावसामुळे धरणाच्या पाणीसाठ्यात झपाट्याने वाढ होत आहे. पवना धरण सध्या ९९ टक्के भरले असून धरणातील पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी पवना नदीपात्रातील विसर्ग वाढविण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. सध्या नदीपात्रात ५,७२० क्युसेक विसर्ग सुरू असून तो वाढवून आज (दि.०३) रोजी सकाळी दहा वाजता १०,००० क्युसेक इतका करण्यात आला आहे



पवना धरण प्रकल्प कार्यालयाने दिलेल्या माहितीनुसार, धरणाच्या पाणलोट क्षेत्रात तसेच घाटमाथ्यावर सातत्याने पाऊस सुरू असल्याने धरणात मोठ्या प्रमाणात पाण्याची आवक होत आहे. पावसाचे प्रमाण आणि येणारा पाण्याचा प्रवाह लक्षात घेता हा विसर्ग टप्प्याटप्प्याने वाढवून १५,००० क्युसेकपर्यंत नेण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे

सततच्या पर्जन्यामुळे नदी, नाले आणि ओढ्यांच्या पाणीपातळीत अचानक वाढ होऊ शकते. त्यामुळे पवना नदीच्या सखल भागांमध्ये पूरसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असल्याने नदीकाठच्या नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

प्रशासनाने नागरिकांना नदीपात्रातील शेती अवजारे, कृषी पंप, जनावरे तसेच इतर साहित्य सुरक्षित ठिकाणी हलविण्याच्या सूचना दिल्या आहेत. तसेच कोणत्याही अफवांवर विश्वास न ठेवता प्रशासनाकडून वेळोवेळी जारी करण्यात येणाऱ्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# एसआयआरच्या कामात शिक्षक व्यस्त; पालिका शाळांतील विद्यार्थ्यांच्या शिक्षणावर मोठा परिणाम

## चौथीतील विद्यार्थ्यांनाही वाचन-लेखनाची अडचण; बीएलओ, जनगणना आणि निवडणूक कामांमुळे अध्यापनाकडे दुर्लक्ष झाल्याचा पालकांचा आरोप

**पिंपरी | प्रतिनिधी**

महापालिकेच्या शाळांतील अनेक शिक्षक एसआयआर तसेच जनगणना अशा कामात गुंतले आहेत; मात्र शिक्षकांच्या या कामाच्या व्यग्रतेमुळे पालिका शाळांतील इयत्ता पहिली ते चौथीपर्यंतच्या अनेक विद्यार्थ्यांना मराठी वाचनही करता येत नसल्याचे धक्कादायक चित्र समोर आले आहे. या परिस्थितीवरून आपला पाल्य शाळेत जातोय; पण शिकतोय काय? असा प्रश्न या पालकांना पडला आहे.

एक शिक्षक एसआयआर कामावर गेल्याने ४० - ५० मुलांचा वर्ग इतर मानधनावरील शिक्षकांना सांभाळावा लागतो. शैक्षणिक मूल्यमापन नाही. वह्या तपासणे, चाचण्या घेणे, पालक मेळावे बंद. जी मुले पहिली आणि दुसरी इयत्तेत शिकत आहेत. त्यांच्या पायाभूत शिक्षणावर परिणाम झाला आहे. शाळेत जावून फक्त डबा खाणे आणि खेळ खेळणे यामुळे अभ्यासातील गोडी संपुष्टात येत आहे. आधीच लिहिता-वाचता येईना अशी परिस्थिती, त्यात ही भर याचा परिणाम म्हणून पालिका शाळांतील विद्यार्थ्यांना मूलभूत वाचन-लेखन-गणित येत नाही. ३ री व ४ थी चे मूल साधे वाक्य वाचू शकत नसल्याचे चित्र आहे.

निवडणूक आयोगाच्या बीएलओ म्हणजे बूथ लेव्हल ऑफिसर आणि एसआयआर म्हणजे मतदार यादी विशेष पुनरीक्षणाच्या कामात तसेच इतरही अशैक्षणिक कामात शिक्षक गुंतल्याने पिंपरी-चिंचवड पालिका शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता ढासळल्याचा आरोप पालक आणि शिक्षक संघटना करत आहेत. पालिका शाळांतील अनेक शिक्षकांना गेल्या ३ - ४ महिन्यांपासून मतदार यादी दुरुस्ती, नवीन नाव नोंदणी, घरोघरी सर्वेक्षण यासारखी बीएलओची कामे देण्यात आली आहेत. परिणामी अनेक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ढासळली असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.




### शैक्षणिक गुणवत्ता ढासळल्याचा पालकांचा आरोप

» निवडणूक आयोगाच्या बीएलओ म्हणजे बूथ लेव्हल ऑफिसर आणि एसआयआर म्हणजे मतदार यादी विशेष पुनरीक्षणाच्या कामात तसेच इतरही अशैक्षणिक कामात शिक्षक गुंतल्याने पिंपरी-चिंचवड पालिका शाळांतील शैक्षणिक गुणवत्ता ढासळल्याचा आरोप पालक आणि शिक्षक संघटना करत आहेत. पालिका शाळांतील अनेक शिक्षकांना गेल्या ३ - ४ महिन्यांपासून मतदार यादी दुरुस्ती, नवीन नाव नोंदणी, घरोघरी सर्वेक्षण यासारखी बीएलओची कामे देण्यात आली आहेत. परिणामी अनेक विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता ढासळली असल्याचे पालकांचे म्हणणे आहे.

### सरकारी कामे की अध्यापन?

» मागील दोन वर्षे निवडणुकांचे कामकाम होते. त्यामुळे अनेक शिक्षकांना बीएलओचे कामकाज देण्यात आले होते; तसेच शिक्षकांना निवडणूक कामावर हजर राहण्याचे आदेश दिले होते. शाळेचे वर्ग सुटल्यानंतर आणि सुटीच्या दिवशीही कामे करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यामुळे शाळेत शिकवायचे कधी? की ही कामे करायची? निवडणुकीच्या कामात अडकल्यामुळे शिक्षकविना विद्यार्थ्यांची अशी परिस्थिती शाळांमध्ये होती.

> गेल्या वर्षीपासून शिक्षकांना निवडणूक कामकाज, जनगणना आणि आता एसआयआरचे काम तसेच इतरही अशैक्षणिक कामांमुळे शिक्षकांना शिकवायला वेळच नाही. मिळेल त्या वेळेत शिक्षक वर्गात अध्यापन करतात. मात्र, ही कामे पूर्ण झाल्यानंतर अप्रगत मुलांच्या प्रगतीसाठी विशेष लक्ष दिले जाईल.
>
> - संगीता बांगर (प्रशासन अधिकारी, शिक्षण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका)

# पिंपरी-चिंचवडमध्ये तुटलेले रस्ता दुभाजक ठरताहेत धोकादायक; अपघाताची शक्यता वाढली

## बीआरटी मार्ग, चौक आणि प्रमुख रस्त्यांवरील दुभाजकांची दुरवस्था; महापालिकेकडून तातडीच्या दुरूस्तीची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील बीआरटी मार्गालगत तसेच प्रमुख रस्ते, चौक आणि उपनगरांमधील अनेक ठिकाणी बसविण्यात आलेल्या रस्ता दुभाजकांची दुरवस्था झाली आहे. अनेक ठिकाणी अज्ञात भरधाव वाहनांच्या धडकेमुळे तुटलेले रस्ता दुभाजक अपघाताला निमंत्रण देत असल्याचे चित्र आहे; मात्र या धोकादायक परिस्थितीकडे संबंधित यंत्रणांचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.

उद्योगनगरीत वाहनांची मोठी वर्दळ असते. वाहतूक व्यवस्था कोलमडू नये म्हणून अनेक ठिकाणी महापालिकेकडून रस्ता दुभाजक बसविण्यात आले आहेत. अनेक ठिकाणी हे दुभाजक तुटलेले असून ते इतर वाहन चालकांसाठी धोक्याचे ठरत आहेत. विशेषतः रात्रीच्या वेळी व पावसाळ्यात पाणी साचल्याने वाकलेले किंवा तुटलेले दुभाजक वाहन चालकांच्या नजरेस पडत नाहीत. त्यामुळे या दुभाजकांना धडकून गंभीर अपघात होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

शहरातील काही वळणांवर रस्ता दुभाजकाचा भाग रस्त्याच्या दिशेने बाहेर आल्याने वेगात जाणारे वाहन धडकून वाहन चालकाला गंभीर अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. वाहनांची धडक झाल्यानंतर नुकसानग्रस्त दुभाजक तातडीने बदलणे अथवा तेथे इशारा फलक, रिफ्लेक्टर अथवा सुरक्षा बॅरिकेड लावणे गरजेचे आहे; मात्र अनेक ठिकाणी वाहन चालकांच्या सुरक्षिततेसाठी अशी कोणतीही उपाययोजना केली नसल्याचे दिसून येत आहे. महापालिका प्रशासनाचा हलगर्जीपणा अपघाताला कारणीभूत ठरू शकतो.

अपघात घडल्यानंतर उपाययोजना करण्यापेक्षा संभाव्य धोका वेळेत ओळखून योग्य ती उपाययोजना करणे गरजेचे आहे. शहरातील तुटलेले अथवा दुरवस्था झालेले दुभाजक नागरिकांच्या जीवितालाच धोका निर्माण करणारे आहेत. त्यामुळे संबंधित विभागाने तातडीने दुरुस्तीची मोहीम हाती घेण्याची मागणी नागरिकांतून केली जात आहे. अन्यथा अपघात घडल्यानंतर नेहमीप्रमाणे पालिका यंत्रणेस जाग येऊन उपयोग काय, असाही प्रश्न उपस्थित होत आहे.



> शहरातील तुटलेले तसेच दुरवस्था झालेल्या दुभाजकांची पाहणी करून, त्या ठिकाणी तातडीने दुरुस्ती केली जाईल; तसेच आवश्यक तेथे सुरक्षा उपाय योजना करण्यात येतील.
>
> - विजय भोजने, बीआरटी रस्ता आस्थापना अधिकारी पीसीएमसी

# आयुक्तांची खुर्ची जप्त करण्याचे आदेश!

## कोर्ट बेलीफ कार्यालयात धडकताच कर्मचाऱ्यांनी ठोकले कुलूप; 11 ऑगस्ट 2026 पर्यंत 12 कोटी जमा करण्याचे प्रशासनाचे प्रतिज्ञापत्र.

**पुणे | प्रतिनिधी**

उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथे कचरा डेपोसाठी संपादित केलेल्या जमिनीचा मोबदला काही शेतकऱ्यांना दिला नसल्याने महापालिका आयुक्तांची खुर्चीच जप्तीचे आदेश न्यायालयाने दिला. त्यामुळे २१ वर्षे ढिम्म बसलेले पालिका प्रशासन पुरते हादरले आणि खुर्ची वाचवण्यासाठी त्यांची पळापळ सुरू झाली.

अखेर तातडीने न्यायालयात प्रतिज्ञापत्र दाखल करीत शेतकऱ्यांचे पैसे देण्याचे आश्वासन देत प्रशासनाने कशीबशी अब्रू वाचवली. शेतकऱ्यांचे वकील ॲड. अशोक फडके यांनी पत्रकार परिषदेत यासंदर्भात माहिती दिली. सन २००२ मध्ये वीज मंडळ, रेल्वे, रस्ता आणि महापालिकेने कचरा डेपोसाठी उरुळी देवाची आणि फुरसुंगी परिसरातील शेकडो एकर जमीन संपादित केली.

२००५ मध्ये महापालिकेने संपादित केलेल्या १०० एकर जमिनीचे अवॉर्ड झाले. परंतु, येथील काही शेतकऱ्यांना जागेचा मोबदलाच मिळाला नाही. महापालिकेने अक्षरशा ७० ते साडेतीन हजार रुपये गुंठ्याने भूसंपादन केले. या विरोधात शेतकऱ्यांनी न्यायालयात दाद मागितली. न्यायालयाने शेतकऱ्यांना त्या वेळच्या दरानुसार ७० ते ७५ हजार रुपये गुंठा याप्रमाणे भरपाईचे आदेश दिले.



### शेतकऱ्यांची न्यायासाठीची दीर्घ लढाई

» भूसंपादनानंतर योग्य मोबदला न मिळाल्याने प्रभावित शेतकऱ्यांनी अनेक वर्षे न्यायालयीन लढा सुरू ठेवला. ॲड. अशोक फडके यांच्या मार्गदर्शनाखाली शेतकऱ्यांनी उच्च न्यायालय आणि स्मॉल कॉज कोर्टात दाद मागितली. न्यायालयाने वारंवार भरपाई देण्याचे आदेश दिले, तरीही त्याची अंमलबजावणी झाली नाही. यामुळे अनेक शेतकरी भूमिहीन होऊन आर्थिक अडचणीत सापडल्याचा आरोप करण्यात आला. प्रलंबित मोबदला लवकरात लवकर देऊन न्याय मिळावा, अशी मागणी शेतकऱ्यांनी केली आहे.

परंतु त्यानंतरही महापालिकेने या आदेशाकडे दुर्लक्ष केले. दरम्यान, २०१८ मध्ये उच्च न्यायालयाच्या आदेशाचा आधार घेत शेतकऱ्यांनी पुन्हा स्मॉल कॉज कोर्टाकडे अर्ज दाखल केला. २०१८ मध्ये कोर्टानेही महापालिकेला शेतकऱ्यांना मोबदला देण्याचे आदेश दिले. परंतु, पालिकेने पुन्हा अपिलात जाण्याचा बहाणा करीत त्याकडे दुर्लक्ष केले.

यामुळे शेतकऱ्यांनी स्मॉल कॉल कोर्टाकडे जमिनीचा मोबदला आणि नुकसान भरपाईसाठी महापालिका आयुक्तांची खुर्ची तसेच कार्यालयातील अन्य वस्तू जप्त कराव्यात, असे आदेश दिले. या आदेशाची अंमलबजावणी करण्यासाठी सोमवारी कोर्टातील बेली पोलिसांसह आयुक्त कार्यालयात आले होते. परंतु, कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी आयुक्त कार्यालयाचे कुलूप उघडले नाही.

### 21 वर्षांनंतरही मोबदला प्रलंबित

» उरुळी देवाची आणि फुरसुंगी येथील कचरा डेपोसाठी २००२ मध्ये संपादित करण्यात आलेल्या जमिनींपैकी काही शेतकऱ्यांना अद्याप मोबदला मिळालेला नाही. २००५ मध्ये जमिनीचे अवॉर्ड जाहीर झाले असतानाही अनेक शेतकरी भरपाईपासून वंचित राहिले. न्यायालयाने त्या वेळच्या बाजारभावानुसार भरपाई देण्याचे आदेश दिले होते. मात्र, महापालिकेने आदेशाची अंमलबजावणी न केल्याने शेतकऱ्यांनी पुन्हा न्यायालयात धाव घेतली. दोन दशकांहून अधिक काळ प्रलंबित असलेला हा प्रश्न आता पुन्हा ऐरणीवर आला आहे.

> "आज न्यायालयात प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आले आहे. तक्रारदार शेतकऱ्यांच्या जमिनीच्या मोबदल्याचे साधारण बारा कोटी रुपये ११ ऑगस्ट २०२६ पर्यंत जिल्हाधिकारी कार्यालयात जमा करण्यात येतील, असे प्रतिज्ञापत्राद्वारे आश्वासित करण्यात आले आहे. त्यामुळे खुर्ची जप्तीची कोणतीही कारवाई होणार नाही.""
>
> **- ॲड. निशा चव्हाण, मुख्य विधी अधिकारी, पुणे महापालिका**

महापालिकेच्या विधी विभागाला याबाबत कळवण्यात आले. त्यांची पळापळ झाली. विधी विभागाच्या अधिकाऱ्यांनी त्या दरम्यान थेट न्यायालय गाठले आणि प्रतिज्ञापत्र दाखल केल्याचे ॲड. फडके यांनी सांगितले. सरकारच्या तसेच महापालिकेच्या विविध विभागांनी भूसंपादन यासाठी शेतजमिनी घेतल्याने अनेक शेतकरी भूमिहीन झाले आहेत.

त्यांच्या मोबदल्याचे पैसे दिले जात नाहीत, यामुळे शेतकरी कंगाल झाले आहेत. याला सर्वस्वी महापालिका आणि सरकारी यंत्रणा जबाबदार असल्याचा आरोपही ॲड. फडके यांनी केला. यावेळी लीलाबाई हरपळे, हरिश्चंद्र हरपळे, विनायक हरपळे, कांता हरपळे हे शेतकरी उपस्थित होते.

# पुणे-पिंपरीतील 18 हजार रेल्वे झोपड्यांच्या पुनर्वसनाचा पेच

## रेल्वेने जागा आणि निधी देण्यास नकार दिल्याने अडचण; एसआरएकडून राज्य सरकारकडे स्पष्ट धोरणाची मागणी

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे आणि पिंपरी-चिंचवड शहरातील रेल्वेच्या मालकीच्या जागांवरील तब्बल १८ हजार झोपड्यांच्या पुनर्वसनाचा पेच निर्माण झाला आहे. रेल्वेच्या जागांवरील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी जागा आणि निधी देण्यास रेल्वे प्रशासनाने नकार दिल्याने या झोपड्यांचे पुनर्वसन कसे करायचे? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. त्यामुळे याबाबत राज्य शासनानेच स्पष्ट धोरण जाहीर करावे, अशी मागणी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने केली आहे

पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिका हद्दीतील झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची (एसआरए) स्थापना करण्यात आली आहे. नव्या नियमावलीनुसार आता शासकीय जागांवरील झोपड्यांचे पुनर्वसन करण्याचे अधिकार एसआरएकडे आहेत. मात्र, रेल्वेच्या जागा थेट केंद्र शासनाच्या अखत्यारीत येतात



त्यामुळे या जागांवरील झोपडपट्यांचे पुनर्वसन करता येत नाही. रेल्वे प्रशासनही जागा आणि निधी दोन्ही देण्यास तयार नाही. एसआरएच्या नोंदीनुसार पुणे व पिंपरी-चिंचवड परिसरातील रेल्वेच्या जागांवर ताडीवाला रोड येथे १४ हजार ८३३, घोरपडीमध्ये १ हजार ९५, आनंदनगर (पिंपरी) मध्ये २ हजार ४५४, जुना बाजारमध्ये ४९० आणि पाटकर प्लॉट, शिवाजीनगर येथे ५० अशा एकूण सुमारे १८ हजार झोपड्या आहेत. त्यामुळे या झोपडपट्टीधारकांचे पुनर्वसन करून त्यांना हक्काचे घर कसे द्यायचे? असा प्रश्न उभा राहिला आहे

### विभागीय आयुक्तांनी बैठक घ्यावी

» रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्टीधारकांच्या पुनर्वसनाबाबत राज्य शासनाने धोरणात्मक निर्णय घेण्याची आवश्यकता आहे. त्यासाठी रेल्वे, राज्य शासन, महापालिका आणि एसआरए यांच्यात समन्वय साधून पुनर्वसनाचा मार्ग निश्चित करण्यासाठी विभागीय स्तरावर बैठक घेण्यात यावी, अशी मागणी एसआरएचे मुख्य कार्यकारी अधिकारी सतीशकुमार खडके यांनी विभागीय आयुक्तांकडे पत्राद्वारे केली आहे.

दरम्यान, रेल्वे, गृहनिर्माण विभाग, जिल्हाधिकारी आणि महापालिका यांच्यात अनेकवेळा पत्रव्यवहार झाला. मात्र, रेल्वेच्या मालकीच्या जमिनीवर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सुधारणा, निर्मूलन व पुनर्विकास) अधिनियम १९७१ मधील तरतुदी लागू होत नसल्याचे रेल्वेने स्पष्ट केले आहे. त्यामुळे राज्य शासनाने खर्चाची प्रतिपूर्ती करण्याबाबत भूमिका घेतल्यास हा प्रश्न सुटू शकतो; अन्यथा रेल्वेच्या जागेवरील झोपडपट्ट्यांचे पुनर्वसन करणे कठीण होणार आहे. अन्यत्र जागा उपलब्ध करून दिल्यास रेल्वेकडून कोणतीही आर्थिक मदत दिली जाणार नसल्याचे पत्राद्वारे कळविले आहे.

# पुरंदर विमानतळासाठी भूसंपादनास पुन्हा मुदतवाढ; 92.5 टक्के शेतकऱ्यांची संमती

## 16 ऑगस्टपर्यंत संमतिपत्रे-प्रतिज्ञापत्रे स्वीकारणार; 2,600 कोटींचा मोबदला वितरित, उर्वरित शेतकऱ्यांना दिलासा

**पुणे | प्रतिनिधी**

छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय (पुरंदर) विमानतळाच्या भूसंपादन प्रक्रियेसाठी जिल्हा प्रशासनाने पुन्हा एकदा मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. भूसंपादनासाठी आवश्यक संमतिपत्रे व प्रतिज्ञापत्रे सादर करण्याची अंतिम मुदत आता १६ ऑगस्टपर्यंत वाढविण्यात आली आहे. सध्या ९२ टक्क्यांहून अधिक शेतकऱ्यांनी संमती दिली असून, उर्वरित शेतकऱ्यांनाही संधी मिळावी, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये तीन हजार एकर क्षेत्रावर विमानतळ उभारण्यात येणार असून, त्यासाठी १,२१६ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे. या प्रक्रियेसाठी ७ मेपासून शेतकऱ्यांकडून संमतिपत्रे व प्रतिज्ञापत्रे स्वीकारण्यास सुरुवात झाली होती. तीनवेळा मुदतवाढ दिल्यानंतरही काही शेतकऱ्यांकडून कागदपत्रे सादर होणे बाकी आहे.



### 2,600 कोटींचा मोबदला शेतकऱ्यांच्या खात्यात

» विमानतळ भूसंपादन प्रक्रियेत आतापर्यंत ६३० हेक्टर क्षेत्राच्या जमीनमालकांच्या खात्यात मोबदल्याची रक्कम जमा करण्यात आली आहे. यासाठी सुमारे २,६०० कोटी रुपये वितरित करण्यात आले असून, हे एकूण भूसंपादित क्षेत्राच्या ५२ टक्के आहे. राज्य शासनाने या प्रकल्पासाठी ३,१५० कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून दिला असून, प्रशासनाकडे अद्याप ५०० कोटी रुपये शिल्लक आहेत. उर्वरित शेतकऱ्यांची कागदपत्रे पूर्ण होताच मोबदला वितरणाची प्रक्रिया वेगाने पूर्ण केली जाणार आहे.

प्रशासनाच्या माहितीनुसार, उर्वरित सात ते आठ टक्के शेतकरी संमती देण्यास तयार आहेत; मात्र कौटुंबिक वाद, वैयक्तिक अडचणी आणि इतर कारणांमुळे त्यांना विलंब होत आहे. या शेतकऱ्यांवर अन्याय होऊ नये आणि शासनाच्या आकर्षक मोबदला पॅकेजचा लाभ त्यांनाही मिळावा, यासाठी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे.

आत्तापर्यंत १,२१६ हेक्टरपैकी १,१२५ हेक्टर (९२.५ टक्के) जमिनीसाठी संमती मिळाली आहे. त्यापैकी ६३० हेक्टर क्षेत्राच्या मालकांच्या खात्यात मोबदल्याची रक्कम जमा करण्यात आली असून, हे प्रमाण ५२ टक्के आहे. आत्तापर्यंत शेतकऱ्यांना २,६०० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

राज्य शासनाने यासाठी जिल्हा प्रशासनाला ३,१५० कोटी रुपये उपलब्ध करून दिले असून, सध्या प्रशासनाकडे ५०० कोटी रुपये शिल्लक आहेत. जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी म्हणाले की, काही शेतकऱ्यांच्या वैयक्तिक कारणांमुळे प्रतिज्ञापत्रे सादर करण्यास विलंब होत आहे. त्यांच्याकडून मुदतवाढीची मागणी करण्यात आली होती. त्यामुळे आणखी १५ दिवसांची मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला असून, आता १६ ऑगस्टपर्यंत प्रतिज्ञापत्रे जमा करता येतील.

### भूसंपादनाला शेतकऱ्यांचा मोठा प्रतिसाद

» छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय (पुरंदर) विमानतळ प्रकल्पासाठी सुरू असलेल्या भूसंपादन प्रक्रियेला शेतकऱ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. आतापर्यंत १,२१६ हेक्टरपैकी १,१२५ हेक्टर (९२.५ टक्के) जमिनीसाठी संमती मिळाली आहे. उर्वरित सात ते आठ टक्के शेतकरीही संमती देण्यास तयार असून, वैयक्तिक आणि कौटुंबिक कारणांमुळे काही कागदपत्रे प्रलंबित आहेत. या शेतकऱ्यांनाही शासनाच्या मोबदला पॅकेजचा लाभ मिळावा, यासाठी प्रशासनाने संमतिपत्रे सादर करण्याची मुदत १६ ऑगस्टपर्यंत वाढविली आहे.

### सात गावांमध्ये उभारला जाणार विमानतळ

» पुरंदर तालुक्यातील सात गावांमध्ये सुमारे तीन हजार एकर क्षेत्रावर छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय (पुरंदर) विमानतळ उभारण्यात येणार आहे. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी १,२१६ हेक्टर जमीन संपादित केली जात आहे. विमानतळामुळे पुणे जिल्ह्याच्या हवाई संपर्काला नवी दिशा मिळणार असून, उद्योग, व्यापार, पर्यटन आणि रोजगाराच्या संधींना मोठी चालना मिळेल. प्रकल्पामुळे परिसरातील पायाभूत सुविधा विकसित होऊन स्थानिक अर्थव्यवस्थेलाही दीर्घकालीन लाभ होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# भाटघर धरण 100 टक्के भरले; वेळवंडी नदीत 2,615 क्युसेक विसर्ग, नदीकाठच्या नागरिकांना सतर्कतेचा इशारा

## बारामती-सोलापूरसाठी महत्त्वाचे येसाजी कंक जलाशय यंदा 15 दिवस आधी ओव्हरफ्लो; निरा देवघर धरणही 98 टक्के भरले

**पुणे | प्रतिनिधी**

बारामती, सोलापूर जिल्ह्याला वरदान ठरलेले भाटघर धरण (येसाजी कंक जलाशय) रविवारी (दि. २) दुपारी ४.३० च्या सुमारास १०० टक्के भरले. वीजनिर्मिती केंद्र व ४५ स्वयंचलित दरवाजांतून वेळवंडी नदीपात्रात २,६१५ क्युसेकने विसर्ग सोडण्यात आला आहे. त्यामुळे नदीकाठच्या नागरिकांना सावधानतेचा इशारा देण्यात आला आहे, असे कार्यकारी अभियंता दिगंबर डुबल यांनी सांगितले.



हिर्डोशी खोऱ्यातही मुसळधार पाऊस सुरू असल्याने निरा देवघर धरण ९८ टक्के भरले आहे. येत्या दोन दिवसांत धरण १०० टक्के भरण्याची चिन्हे आहेत. धरणाच्या वीजनिर्मिती केंद्रातून ७५०, तर सांडव्यातून २४२१ असा एकूण ३१७१ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. भाटघर धरणक्षेत्रात ७२२, निरा देवघर १५५७, गुंजवणी १६४१, वीर ३५६ असा एकूण ३९३८ मिलिमीटर पाऊस धरणक्षेत्रात पडला.

दरम्यान, मागील वर्षाच्या तुलनेने धरण यंदा १५ दिवसांनी लवकर भरले. भोर तालुक्याच्या पश्चिम भागात गेल्या दोन दिवसांपासून रिमझिम पाऊस पडत आहे. विशेषतः भुतोंडे, मळे, पांगारी परिसरात होत असलेल्या पावसाने धरणसाठ्यात झपाट्याने वाढ

जुलैच्या शेवटच्या आठवड्यात पावसाने जोरदार हजेरी लावल्याने ऑगस्ट महिन्याच्या सुरुवातीस भाटघर धरण १०० टक्के भरले. भाटघर धरणाची साठवणक्षमता २३ टीएमसी आहे. एकूण ८१ दरवाजे असून, ४५ स्वयंचलित, ३६ अस्वयंचलित आहेत. स्वयंचलित दरवाजातून १००० क्युसेकने विसर्ग सुरू आहे.

### निरा देवघर 98 टक्के भरले

» हिर्डोशी खोऱ्यातही मुसळधार पाऊस सुरू असल्याने निरा देवघर धरण ९८ टक्के भरले आहे. येत्या दोन दिवसांत धरण १०० टक्के भरण्याची चिन्हे आहेत. धरणाच्या वीजनिर्मिती केंद्रातून ७५०, तर सांडव्यातून २४२१ असा एकूण ३१७१ क्युसेकने विसर्ग सुरू आहे. भाटघर धरणक्षेत्रात ७२२, निरा देवघर १५५७, गुंजवणी १६४१, वीर ३५६ असा एकूण ३९३८ मिलिमीटर पाऊस धरणक्षेत्रात पडला.